


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २५१, शनिवार २२ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# फेरमतमोजणी नव्हे, केवळ मशिन तपासणार!

## ■ निवडणूक निर्णय अधिकारी राहुल पाटील यांची माहिती
## ■ तांत्रिक बिघाड आहे का एवढेच तपासले जाणार

नगर : प्रतिनिधी

**नगर लोकसभा निवडणूकीमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्याकडून २८ हजार ९२९ मतांनी पराभूत झाल्यानंतर भाजपाचे उमेदवार मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी ४० मतदार केंद्रावरील ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशिनची पडताळणी करण्याची मागणी केल्यानंतर आता या केंद्रावरील मशिनमधील मतांची फेरमतमोजणी होणार नसून केवळ मशिन तपासणी करून त्यात काही बिघाड आहे का हे पडताळले जाणार असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील यांनी सांगितले.**

सुप्रिम कोर्टाने एप्रिल महिन्यात दिलेल्या निर्णयानुसार निवडणूकीमधील दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराला ५ टक्के मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट मशीन पडताळणी करण्याची संधी दिलेली आहे. निकाल जाहिर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत त्यासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज करणे बंधनकारक होते. त्यानुसार दि. ४ जुन रोजी निकाल जाहिर झाल्यानंतर दुसऱ्या क्रमांकावरील भाजपाचे उमेदवार डॉ सुजय विखे पाटील यांनी १० जुन रोजी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याकडे मशीन पडताळणीसाठी अर्ज केला होता.



### अभियंत्यांच्या उपस्थितीत होणार पडताळणी

**बंगळूर येथील ईव्हीएम व व्हीव्हीपॅट निर्मीती करणाऱ्या बेल कंपनीच्या अभियंत्यांच्या उपस्थितीमध्ये खा. डॉ. विखे पाटील यांनी मागणी केलेल्या मतदानकेंद्रावरील मशिनची पडताळणी करण्यात येणार आहे. त्या मतदानकेंद्रांवरील बॅलेट कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट व ईव्हीएम मशिन यांच्यात काही तांत्रिक बिघाड आहे का ? एवढेच तपासण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.**

### उमेदवारांना अपिलासाठी संधी

**पराभूत उमेदवाराने न्यायालयाच्या निर्देशानुसार पाच टक्के मतदान केंद्रांवरील पडताळणी करण्यासाठी अर्ज दाखल केल्यानंतर ४५ दिवसानंतर ही प्रक्रिया राबविण्यात येते. आता विखे यांनी अर्ज दाखल केल्यानंतर इतर उमेदवारास त्या विरोधात अपिल करण्यासाठी संधी देण्यात येणार आहे. न्यायालयात अपिल करण्यात आले तर न्यायालयाच्या आदेशानंतर या अर्जावर निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत नगरच्या वखार महामंडळाच्या गोदामांमध्ये ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशिन सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.**

### पारनेरमधील मतदानकेंद्र व उमेदवारांना मिळालेली मते

**बुथ क्र. २४६ मोरवाडी**
नीलेश लंके ६९५
सुजय विखे ७४
बुथ क्र. २६३ हंगा
नीलेश लंके ७६४
सुजय विखे १७३
बुथ क्र. २६४ हंगा
नीलेश लंके ५८१
सुजय विखे १४६
**बुथ क्र.२४१ शिरापूर**
नीलेश लंके ५३५
सुजय विखे १०१
**बुथ क्र. २३७ म्हस्केवाडी**
नीलेश लंके ५१५
सुजय विखे १०४
**बुथ क्र.१६७ रांधे**
नीलेश लंके ५६२
सुजय विखे १२०
**बुथ क्र. ६९ नांदूरपठार**
नीलेश लंके ५५९
सुजय विखे ७५
**बुथ क्र. ६८ नांदूरपठार**
नीलेश लंके ५४६
सुजय विखे ५०
**बुथ क्र. ३०१**
सांगवी सुर्या
नीलेश लंके ७२७
सुजय विखे २३५
**बुथ क्र. २२५**
शेरीकोलदरा
नीलेश लंके
सुजय विखे १३८

### श्रीगोंद्यामधील मतदानकेंद्र व उमेदवारांना मिळालेली मते

**बुथ क्र. ३१६**
टाकळी कडेवळीत
नीलेश लंके ६४८
सुजय विखे २३८
**बुथ क्र. ३१३**
हिरडगांव
नीलेश लंके ६१४
सुजय विखे २०७
**बुथ क्र. १५६**
एरंडोली
नीलेश लंके ५४५
सुजय विखे १४५
**बुथ क्र. २१८ बोरी**
नीलेश लंके ५८६
सुजय विखे १८१
**बुथ क्र. २३०**
बेलवंडी कोठार
नीलेश लंके २९२
सुजय विखे १९१
**बुथ क्र. ९३**
ढवळगांव
नीलेश लंके ५१९
सुजय विखे २६७
**बुथ क्र. १९१**
वडाळी
नीलेश लंके ४१९
सुजय विखे १५५
**बुथ क्र. ३२६**
चिखलठाणवाडी
नीलेश लंके ५०९
सुजय विखे २००
**बुथ क्र. २०४**
बेलवंडी स्टेशन
नीलेश लंके ५९०
सुजय विखे २८२
**बुथ क्र. १४१**
पिंपळगांव पिसा
नीलेश लंके ५१६
सुजय विखे २०९

### पाथर्डी-शेवगांव मधील मतदानकेंद्र व उमेदवारांना मिळालेली मते

**बुथ क्र. १४५ वाघोली**
नीलेश लंके ५१५
सुजय विखे १४९
**बुथ क्र. ७७ शेवगांव**
नीलेश लंके ५३६
सुजय विखे २७
**बुथ क्र. १४ शहर टाकळी**
नीलेश लंके ५१४
सुजय विखे २०५
**बुथ क्र. ३११ ढमाळवाडी**
नीलेश लंके ३०९
सुजय विखे २६
**बुथ क्र. ८९ शेवगांव**
नीलेश लंके ५२२
सुजय विखे २३९

### कर्जत-जामखेड मतदानकेंद्र व उमेदवारांना मिळालेली मते

**बुथ क्र. ९५**
जामखेड
नीलेश लंके ५६७
सुजय विखे २०६
**बुथ क्र. ११२**
जामखेड
नीलेश लंके ६५३
सुजय विखे ११३
**बुथ क्र. ११४ दुरगांव**
नीलेश लंके ५५८
सुजय विखे १४८
**बुथ क्र. २६४**
बारडगांव दंडगी
नीलेश लंके ६५६
सुजय विखे २३७

### नगर शहरामधील मतदानकेंद्र व उमेदवारांना मिळालेली मते

**बुथ क्र. ८९**
भिंगार
नीलेश लंके ८४२
सुजय विखे २४
**बुथ क्र. ९०भिंगार**
नीलेश लंके ९२३
सुजय विखे ११
**बुथ क्र. ९८**
भिंगार
नीलेश लंके ६१०
सुजय विखे ४५
**बुथ क्र.१८६**
माळीवाडा
नीलेश लंके ५९०
सुजय विखे ४५
**बुथ क्र. १८२**
माळीवाडा
नीलेश लंके ३५३
सुजय विखे ३९

### राहुरीमधील मतदानकेंद्र व उमेदवारांना मिळालेली मते

**बुथ क्र. ११०**
बारगांव नांदूर
नीलेश लंके ५२३
सुजय विखे ११९
**बुथ क्र. ६४ राहुरी बुद्रुक**
नीलेश लंके ४९३
सुजय विखे ९१
**बुथ क्र. ६२ राहुरी बुद्रुक**
नीलेश लंके ५३८
सुजय विखे १५७
**बुथ क्र. २८७**
सावतानगर
नीलेश लंके ५६१
सुजय विखे २०२
**बुथ क्र. २१३**
**जेऊर**
नीलेश लंके ४४४
सुजय विखे १२४

# पुणे जिल्ह्याकडे पालकमंत्र्यांचे लक्षच नाही

## रोहित पवारांचा पालकमंत्री अजित पवारांना टोला



पुणे : प्रतिनिधी

**पुण्यातील शिवाजीनगर भागातील साखर संकुल येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट नियामक मंडळाची बैठक पार पडली. त्या बैठकीला मंत्री दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, राजेश टोपे, रोहित पवार, हर्षवर्धन पाटील यांच्यासह अन्य मंडळी देखील उपस्थित होते. त्या बैठकीनंतर राज्यातील अनेक घडामोडींबाबत रोहित पवार यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.**

राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पुण्यात कोयता गँगच्या घटना वाढल्या आहेत. त्या प्रश्नावर रोहित पवार म्हणाले की, राज्यात शांतता राहिली पाहिजे. यासाठी सर्वांनी पुढे येऊन काम करणे गरजेचे आहे. राज्यात सद्य:स्थितीला मुली, महिलांवरील अन्याय अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. गुंडागर्दी देखील वाढली आहे. रस्त्यावर मुलींना मारले जात आहे. तर पुण्यात कोयता गँगचे प्रमाण वाढलं असून गुंडांनी धुडगूस घातला आहे. त्यावर पोलीस आयुक्तांचा वचक राहिला नाही. त्यामुळे गृहमंत्रीदेवेंद्र फडणवीसकुठे आहेत, असा प्रश्न निर्माण होत आहे, अशा शब्दात देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावला. तसेचपुणेशहर आणि जिल्ह्याकडे पालकमंत्री (अजित पवार) यांचे लक्ष नसल्याचे सांगतअजित पवारयांचे नाव न घेता अप्रत्यक्षपणे रोहित पवार यांनी टोला लगावला.

राज्यातील शेतकरी वर्गापासून सर्व सामान्य नागरिकाचे जगणे मुश्किल झाले आहे. त्या सर्व गोष्टींना महायुती सरकार जबाबदार आहे. त्या विरोधात आगामी विधिमंडळाच्या अधिवेशनात आवाज उठविणार असल्याचे रोहित पवार म्हणाले.

# पाउस असलेल्या ठिकाणची पोलीस भरती पुढे ढकलली

## खा. लंके यांच्या मागणीस देवेंद्र फडणवीसांचा सकारात्मक प्रतिसाद

नगर : प्रतिनिधी



**ऐन पावसाळयाच्या तोंडावर पोलीस भरती प्रक्रिया सुरू करण्यात आल्याने या प्रक्रीयेत सहभागी होउ इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या मागणीची दखल घेउन भरती प्रक्रिया पुढे ढकलण्याच्या खासदार नीलेश लंके यांच्या मागणीस राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. ज्या भागात पाउस आले त्या भागातील भरती प्रक्रीया पुढे ढकलण्याचा निर्णय गृह विभागामार्फत घेण्यात आला आहे.**

अमरावती, सोलापूर, नांदेड येथे पाऊस असल्याने तेथील भरती प्रक्रिया स्थगित करण्यात येउन ही प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली आहे. संबंधित उमेदवारांना पुढील तारखा देण्यात आल्याचे खा. नीलेश लंके यांच्या संपर्क कार्यालयाकडून सांगण्यात आले.

पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी भरती प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी खा. नीलेश लंके यांची भेट घेऊन पावसाळयाच्या तोंडावर घेण्यात येत असलेली ही चाचणी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती. उमेदवारांच्या मागणीची दाखल घेत खा. नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी पत्रव्यवहार करून या उमेदवारांच्या मागणीची दखल घेउन मैदानी चाचणी पुढे ढकलण्याची मागणी केली होती.

राज्यात पावसाचे वातावरण असल्याने, तसेच पाऊस झाल्याने पोलीस भरतीमधील मैदानी चाचणीवर त्याचा परिणाम होऊ शकतो. मागील आठवडयापासून अनेक ठिकाणी पाउस पडत असल्याने भरती प्रक्रियेसाठी मैदानी तयारी करणाऱ्या उमेदवारांना सराव करता आलेला नाही. बहुतांश उमेदवारांनी मोकळया मैदानावर सराव केलेला असून पावसामुळे चिखल झालेल्या मैदानावर चाचणी देणे त्यांना कठीण जाणार आहे. पावसात व चिखलात मैदानी चाचणी देणे धोक्याचे असून त्यामुळे उमेदवारांना दुखापत होउ शकते.

मैदानी चाचणीच्या दिवशी अचानक पाऊस आल्याने भरती प्रक्रिया प्रभावित होऊन त्याचा परिणाम वर्षानुवर्षे भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर होणार असल्याची भिती खा. लंके यांनी या पत्रात व्यक्त केली होती. या मागणीची दखल घेत पाऊस असलेल्या ठिकाणची भरती प्रक्रिया पुढे ढकलण्याचा निर्णय राज्याच्या गृहमंत्र्यांनी घेतला आहे.

# कान्हूरपठार वि.का. संस्थेच्या अध्यक्षपदी पांडूरंग गाडगे उपाध्यक्षपदी तुकाराम लोंढे यांची बिनविरोध निवड



कान्हूरपठार : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यात राजकीय दृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या कान्हूरपठार विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी पांडुरंग गाडगे तर उपाध्यक्षपदी तुकाराम लोंढे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक गणेश औटी यांच्या मार्गदर्शनाखाली भोसले यांनी काम पाहिले.**

यावेळी जेष्ठ संचालक राजाराम ठुबे, कांतीलाल साळवे , बन्सीभाऊ ठुबे, बाळासाहेब नवले, सुखदेव सोनावळे, सावकार बुचुडे,शंकर ठुबे,नवनाथ ठुबे , पोपट वाळुंज,हिराबाई ठुबे,निर्मला व्यवहारे,विमल लोंढे,नंदाबाई जेडगुले, सचीव राजेंद्र ठुबे, याप्रसंगी जाणता राजा प्रतिष्ठानचे अध्यक्ष किरण ठुबे, खंडेश्वर देवस्थानचे विश्वस्त चंद्रभान ठुबे, उपसरपंच प्रसाद नवले, माजी उपसरपंच शिवाजी शेळके, गोवर्धन ठुबे,सुरज नवले, गणेश तांबे , बाबासाहेब गुमटकर, संपत ठुबे, गणेश गायके, गवराम गाडगे ,गोकुळ व्यवहारे, संजय सोनावळे, रमेश सोनावळे बाळासाहेब लोंढे, खंडु लोंढे, दत्तात्रय रसाळ, भाऊसाहेब जपे,संपत गाडगे उपस्थित होते.

अध्यक्ष पदासाठी पांडुरंग गाडगे यांच्या नावाची सुचना संस्थेचे माजी अध्यक्ष बन्सी ठुबे यांनी केली या नावाला संचालक कांतीलाल साळवे यांनी अनुमोदन दिले उपाध्यक्षपदासाठी तुकाराम लोंढे यांच्या नावाची सुचना बाळासाहेब नवले यांनी केली या नावाला राजाराम ठुबे यांनी अनुमोदन दिले यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष गाडगे यांनी सांगितले की कान्हुरपठार वि.का सोसायटीची स्थापना १९४६ साली झाली त्यावेळी पासुन संस्थेचा कारभार संचालक मंडळ अत्यंत काटकसरीने करत आहे मागील चेअरमन असतील किंवा त्यांचे संचालक मंडळ असेल यांनी शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेतले संस्थेची स्वमालकीची इमारत असावी असे बहुसंख्य सभासदांची भावना आहे आगामी काळात संस्थेची उर्वरीत पान ३ वर










फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

# पावसाळ्यात नखांची काळजी



**पावसाळा हा बाकी कितीही रम्य असला तरीही त्वचेसाठी तो काहीसा कठोरच असतो. कारण, अर्थात या दिवसांमध्ये बॅक्टेरियल आणि फंगल इन्फेक्शन्सचा धोका तुलनेनं जास्त असतो. त्यामुळे या दिवसांमध्ये आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेणं आवश्यक ठरतं. दरम्यान, आरोग्य आणि स्वच्छतेच्या बाबतीत खरंतर आपण शक्य तितकी काळजी घेण्याचा प्रयत्न करतच असतो. मात्र, तरीही आपलं एखाद्या लहानशा अवयवाकडे वारंवार दुर्लक्ष होतं. तसेच पावसाळयात शरीराच्या इतर अवयवांप्रमाणेच आपल्या नखांची स्वच्छता टिकवून ठेवणं फार महत्त्वाचं आहे. तसं न केल्यास आपल्याला त्याचे प्रतिकूल परिणाम दिसू शकतात. म्हणूनच पावसाळ्यात नखांची स्वच्छता आणि सौंदर्य हे दोन्ही कसं साधायचं? याबाबत आज ५ टिप्स जाणून घेणार आहोत...**

- कोरडी ठेवा : आपली नखं ही नेहमी कोरडी राहतील यासाठी विशेष काळजी घ्या. विशेषतः पायांची नखं. पावसाळ्यात आपल्या पायांचा सतत पाण्याशी किंवा अस्वच्छ पाण्याशी संपर्क येत असतो. त्यामुळे ही नखं खराब होण्याची शक्यता अधिक असते. सततच्या दमटपणामुळे या जागी मृत त्वचेच्या पेशी आणि संसर्गजन्य जीवाणू तयार होऊन घाण जमा होते. त्यामुळे, ती जितकी कोरडी राहतील तितकं योग्य. त्याचप्रमाणे, पावसाळ्यात बाहेर पडताना खुले शूज, फ्लोटर्स किंवा चप्पल घाला. घरी परत आल्यावर पाय स्वच्छ धुवून नखं व्यवस्थित कोरडी करा.



- अँटीफंगल पावडर : पावसाळ्यात स्वच्छता राखण्यासाठीच्या अत्यावश्यक गोष्टींमध्ये अँटीफंगल पावडरचा देखील समावेश करा. संसर्ग टाळण्यासाठी दिवसातून एकदा ही पावडर आपल्या नखांवर लावा. अँटीफंगल पावडर नसल्यास त्याऐवजी तुम्ही जेनेरिक टॅल्कम पावडर किंवा स्प्रे डिओडोरंट वापरू शकता.
- ट्रिमिंग : आपली नखं वेळच्यावेळी कापा. कारण लांब नखं ही पाणी आणि आर्द्रतेमुळे सर्व जीवाणूंसाठी एक सुरक्षित जागा बनू शकतात. शिवाय, ओलसरपणामुळे आपली नखं किंचित मऊ देखील होतात. त्यामुळे ती सहज वाकण्याची पर्यायाने मोडण्याची शकता जास्त असते. म्हणून, तुम्ही नख ही लहान आणि सुव्यवस्थित ठेवा.
- स्वच्छतेसाठी टोकदार साधनं टाळा : नखांच्या आतल्या बाजूच्या स्वच्छतेसाठी अनेक स्त्रिया या लांब आणि टोकदार साधनांचा वापर करतात. मात्र, ही एक चुकीची पद्धत आहे. यामुळे तुमची नखं आणि नखांच्या त्वचेमधलं अंतर वाढू शकतं. पावसाळ्यात ओलाव्यामुळे संसर्गाच्या अनेक समस्या उदभवू शकतात. सोबतच तुमच्या नखांच्या त्वचेला इजा होण्याचा देखील धोका आहेच. म्हणूनच टोकदार साधनं न वापरता स्वच्छतेसाठी तुम्ही नेल ब्रश वापरू शकता.
- बेस कोट वापरा : नेल पॉलिश लावण्यापूर्वी बेस कोट वापरा. हा लेअर तुमची नखं कमकुवत होण्यापासून रोखेल. तसेच नेल पॉलिश रिमूव्ह करताना नखं आणि क्यूटिकल्स स्मूथ ठेवण्यासाठी चांगल्या दर्जाचं नेल रिमूव्हर वापरा.

# पावसाळ्यात केसांची काळजी घेणारे ४ तेल



**पावसाळ्यात केस गळणे आणि कोंडा होण्याच्या समस्येने लोक त्रस्त असतात. या ऋतूतील आर्द्रतेमुळे हा त्रासही जास्त वाढतो. आर्द्रतेमुळे लोक केसांना तेल लावणे बंद करतात पण असं मुळीच करू नका. पावसाळा असल्याने केसांना तेल लावणे कधीही थांबवू नका. खरं तर, या ऋतूतही, रोजच्या तेलामुळे तुमचे केस निरोगी आणि फ्रिज-फ्री राहू शकतात. पावसाळ्यात केसांना लावलेले तेल तुमच्या केसांमधील खाज आणि ड्राई स्कैल्पपासून सुटका करते. याशिवाय तुमच्या केसांमधील कोंडा आणि केसगळतीदेखील भरपूर प्रमाणात कमी होते. त्यामुळे पावसाळ्यात देखील केसांना पोषण मिळण्यासाठी तेल लावले पाहिजे. तर जाणून घ्या पावसाळ्यात केसांना कोणते तेल चांगले आहे आणि त्याचा वापर कसा करावा...**

- खोबरेल तेल : खोबरेल तेल तुमच्या केसांसाठी सर्वोत्तम तेलांपैकी एक आहे. त्यात आवश्यक फॅटी ॲसिडस् आणि प्रथिने असतात जे तुमच्या टाळूचे खोलवर जाऊन पोषण करतात आणि तुमचे केस मजबूत करतात. नारळाचे तेल तुम्हाला कोरड्या आणि कुरळ्या केसांचा सामना करण्यास देखील मदत करू शकते, जी पावसाळ्यात एक सामान्य समस्या आहे. याशिवाय खोबरेल तेल तुमचे केस फ्रिज-फ्री देखील ठेवते. यामुळे आठवड्यातून २ वेळा खोबरेल तेल यामुळे या तेलाचा आठवड्यातून २ वेळा तरी केसांना वापर केल्यास, याचा चांगला फायदा मिळतो.
- मोहरीचे तेल : मोहरीच्या तेलाने मसाज केल्याने त्वचेवर आणि टाळूवर रक्त प्रवाह सहज वाढतो. केसांवर मोहरीचे तेल वापरावे कारण त्यात अँटीबॅक्टेरियल आणि अँटी फंगल गुणधर्म असतात. यासाठी थोडं मोहरीचं तेल गरम करा आणि त्यानं टाळूला मसाज करा. आपले केस कोमट टॉवेलने काही वेळ झाकून ठेवा आणि थंड पाण्याने धुवा. याने तुमच्या



गरम करून केसांना लावा आणि चांगला मसाज करा.

- ट्री हेअर ऑइल : ट्री हेअर ऑइल पावसाळ्यात केसांना आवश्यक असते. कारण त्यात बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि दाहक-विरोधी गुणधर्म आहेत. ट्री हेअर ऑइल त्याच्या अँटीव्हायरल गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे, जे तुमच्या त्वचेची आणि केसांची काळजी घेऊ शकते. तसंच हे कोरड्या आणि निर्जीव केसांवर सहज उपचार करते. याशिवाय . ट्री हेअर ऑइल लावल्याने तुमच्या केसांमधील कोंडा किंवा टाळूवरील खाज बऱ्याच प्रमाणात कमी होते.

केसांना नक्कीच चांगले पोषण मिळेल. तसंच केसांसंबंधित समस्याही नाहीशा होतील.


- बदाम तेल : बदामाच्या तेलामध्ये व्हिटॅमिन ई मोठ्या प्रमाणात असते आणि ते त्वचा आणि केसांसाठी देखील खूप चांगले आहे. टाळूवर बदामाचे तेल वापरल्याने केसांचे कूप मजबूत होऊ शकतात. तसंच कोरडे केसांची समस्या बदाम तेलामुळे भरपूर प्रमाणात कमी होते. तुमच्या टाळूची मसाज करण्यासाठी तुम्ही बदामाचे तेल ऑलिव्ह ऑईलमध्ये मिसळून लावू शकता, ज्यामुळे तुमचे केस निरोगी, हायड्रेटेड आणि मऊ होतील.

# 'अशी' घ्या केसांची विशेष काळजी!

**पावसाळा ऋतु लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडतो. विशेषतः मुलींना या ऋतूचा मनमोकळा आनंद घ्यायचा असतो. पण यासोबतच त्यांना त्यांच्या केसांची आणि त्वचेची चिंता देखील असते. कारण पावसात केस खराब होण्याची शक्यता जास्त असते. यामुळे पावसाळ्यात केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. या ऋतूत कमीत कमी हेअर प्रोडक्ट्स वापरा असे तज्ञांचे म्हणणे आहे. पावसाळ्यात आपल्या केसांची काळजी कशी घ्यावी याबाबत आपण जाणून घेणार आहोत. पावसाळ्यात केसांच्या होणाऱ्या समस्या आणि त्यावर उपाय याबाबत जाणून घेऊया...**

## पावसाळ्यात केसांचे संरक्षण कसे करावे ?

- पावसाळ्यात केसांमध्ये कमीत कमी उत्पादनांचा वापर करा. आपले केस स्वच्छ ठेवा आणि केस धुतल्यानंतर कंडिशनर लावा.
- केस धुताना प्रत्येक वेळी कंडिशनर वापरा, पण ते टाळू आणि मुळांना लावण्याऐवजी केसांनाच लावा. यामुळे तुमचे केस गळणार नाही.
- केस रोज धुवा आणि स्वच्छ ठेवा. केस धुतल्यानंतर थोडे कोरडे झाल्यावर सीरम लावा. यामुळे तुमच्या केसांचा ओलावा टिकून राहील आणि केस तुटणार नाहीत.
- रोगप्रतिकारक शक्तीचा केसांवर मोठा प्रभाव पडतो. त्यामुळे प्रोटीनयुक्त पदार्थ खा. तसंच अधिक फळे , भाज्या खा आणि भरपूर पाणी प्या.
- पावसाळ्यात केसांना कोमट तेलाने मसाज करा, कारण ते केसांना पोषण देते.
- पावसाळ्यात हेअर ड्रायर वापरणे सहसा टाळा. परंतु, आवश्यक असल्यास फक्त केस कोरडे करा आणि ड्रायर टाळूपासून किमान साडेपाच इंच दूर ठेवून वापरा.
- केसांवर केमिकलयुक्त उत्पादने वापरू नका, म्हणजेच केस सरळ आणि हायलाइट करणे टाळा.
- पावसाळ्यात केस ओले होणार नाहीत याची काळजी घ्या. पावसाच्या



सुरुवातीच्या दिवसांमध्ये पाण्यात , हवेत धूलिकण असतात, ज्यामुळे केस कमकुवत आणि निर्जीव होऊ शकतात.

# पावसाळ्यात केसांना कलर करताना...

**पावसाळ्यात केसांची विशेष काळजी घ्यावी लागते. कारण या ऋतूत केस गळणे, कोंडा होणे आणि केसांना फाटे फुटणे या समस्या खूप वाढतात. अशा परिस्थितीत जर तुम्ही या ऋतूत केस कलर करण्याचा विचार करत असाल तर काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे. या ऋतूमध्ये केसांना कलर करण्याआधी काही खबरदारी घेणे आवश्यक आहे. कारण या ऋतूमध्ये केस अधिक खराब होतात. या व्यतिरिक्त या ऋतूमध्ये केसांचा रंगही चांगला चढत नाही. अशा परिस्थितीत केसांना कलर करताना आपण कोणत्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात हे जाणून घेऊया...**


## या गोष्टी लक्षात ठेवा...

- हेअर कलरच्या गुणवत्तेकडे लक्ष द्या : पावसाळ्यात केसांना कलर करण्याआधी तुम्ही निवडत असलेल्या रंगाचा दर्जा चांगला आहे की नाही याकडे लक्ष द्या. यासाठी केसांना कलर लावण्याआधी पॅच टेस्ट करा कारण या कलरच्या वापरामुळे केसांचे नुकसान होऊ शकते.
- केस कलर करण्याआधी केसांना तेल लावा : केस कलर करण्याच्या एक ते दोन दिवस आधी केसांना तेलाने चांगले मसाज करा कारण तेल केसांना पोषण देते आणि त्यांना मजबूत बनवते. त्यामुळे केस खराब होत नाहीत आणि कलर केल्यानंतर कोरडेही होत नाहीत. त्याचवेळी, पावसाळ्यात केसांची चमक निघून जाते, त्यामुळे केसांना तेलाने मसाज करणे आवश्यक आहे.
- डोळ्यांना होणाऱ्या नुकसानाकडे लक्ष द्या : पावसाळ्यात त्वचेसोबतच डोळ्यांना संसर्ग होण्याचा धोकाही वाढतो. अशा परिस्थितीत, संसर्गाच्या वेळी डोळ्यात कलर जाता कामा नये. कारण केसांचा रंग तुमच्या डोळ्यांचा संसर्ग अनेक पटींनी वाढवू शकतो.

# 'या' लिपस्टिक शेड्स करा ट्राय!

**पावसाळ्यात आद्रता जास्त असते. त्यामुळे खूप घाम येतो. अशा परिस्थितीत जास्त मेकअप वापरल्यास सुंदर दिसण्याऐवजी तुमचा लूक खराब करू शकतो. पावसाळ्यात हलका मेकअप करणे जास्त चांगले आहे आणि काही विशेष प्रकारच्या लिपस्टीक तुमच्या मेकअप किटमध्ये ठेवू शकता. आज आम्ही तुम्हाला अशा लिप्स शेड्स बाबत सांगणार आहोत ज्या वापरून तुम्ही पावसाळ्यातही तुमचा लूक चांगला दिसेल...**

- बेरी टोन : पावसाळ्यात बेरीच्या वेगवेगळ्या शेड्स जसे की डीप रेड, प्लम किंवा क्रॅनबेरी असे रंग निवडा. हे शेड्स जवळजवळ प्रत्येक त्वचेच्या टोनला सूट देतात आणि तुमचा लूक सुधारण्यासाठी मदत करतात.
- रोज पिंक : सॉफ्ट रोज पिंक शेड्स तुम्हाला सुंदर दिसण्यासोबतच तरुण दिसण्यासाठी देखील मदत करतात. ते ओठांना नॅचरल लूक देतात, सर्वात चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही त्यांना कॅज्युअल आणि फॉर्मल लूकमध्ये वापरू शकता.
- कोरल शेड : चमकदार कोरल शेड्स पावसाळ्याच्या दिवसामध्ये हटके लूक देण्यासाठी मदत करतात. या रंगामुळे तुम्ही तुमच्या वास्तविक वयापेक्षा तरुण दिसता आणि तुमचे सौंदर्य वाढवतात.
- न्यूड शेड्स : जर तुम्हाला गडद लिपस्टिक वापरणे आवडत नसेल तर तुम्ही न्यूड शेड्स निवडू शकता. न्यूड शेड्सही प्रत्येक आउटफिटसोबत वापरता येतात.
- मोव्ह शेड : गुलाबी आणि जांभळ्या रंगाची शेड असलेली लिपस्टिक ही एक दिवसभरच्या लूकसाठी योग्य पर्याय आहे. बरं, तुम्ही रात्रीच्या पार्टीसाठी किंवा लग्नासाठी या शेड्स वापरून पाहू शकता.



# पावसाळ्यात चेहऱ्यावर मुरूम?

**पावसाळ्यात त्वचेची खूप काळजी घ्यावी लागते. अन्यथा चेहऱ्यावर अनेक मुरुम येतात किंवा चेहरा खूप तेलकट दिसू लागतो. त्वचेची योग्य काळजी घेऊनही चेहऱ्यावर मुरुम येतात. याचा अर्थ तुम्ही काळजी घेताना कुठेतरी चुकत आहात. ज्यामुळे चेहऱ्यावर मुरुम येण काही थांबत नाही. अशावेळी तुम्ही त्वचेची काळजी घेताना कुठे चुकत आहात आणि मुरुपांपासून कशी मुक्तता मिळवायची जाणून घ्या...**

- त्वचेवर चुकीचे केअर प्रोडक्ट्स वापरणे : स्कीन केअर प्रोडक्ट वापरण्यापूर्वी, आपली त्वचा तेलकट, कोरडी किंवा सामान्य यापैकी कोणती आहे हे नीट तपासून घ्या. जर तुम्ही त्वचेनुसार चुकीचे स्कीन प्रोडक्ट वापरत असाल तर तुमची त्वचा खराब होऊ शकते. तसेच चेहऱ्यावर मुरुम येऊ लागतात.



- हानिकारक मेकअप प्रोडक्ट वापरणे : मेकअप प्रोडक्ट चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्यासाठी वापरले जातात. पण मेकअपचे अनेक प्रोडक्ट बाजारात आहेत ज्यामध्ये केमिकलचे प्रमाण खूप जास्त असते. यामुळे चेहऱ्यावर बराच वेळ मेकअप ठेवल्याने योग्य ऑक्सिजन मिळत नाही यामुळेही चेहऱ्यावर मुरुम येतात.
- चेहऱ्यावर चुकीचे क्लींझर वापरणे : चेहऱ्याच्या त्वचेनुसार योग्य क्लींझरची निवड करणे देखील खूप महत्वाचे आहे, अन्यथा चेहऱ्याची त्वचा खराब होऊ शकते. तुम्ही फोम क्लींझर वापरू नका, तसेच स्किन एक्सफोलिएट करण्यासाठी क्लींझर वापरू नये. असे केल्याने त्वचेला भोगा पडण्यास सुरुवात होते. जर तुम्हाला सर्वोत्तम परिणाम मिळवायचा असेल, तर फक्त वॉटर बेस्ड क्लींझर लावा.
- फक्त वाइप्सच्या मदतीने मेकअप काढा : चेहऱ्यावरील मेकअप काढण्यासाठी वाइप्सचा वापर करा, पण त्यानंतर चेहरा स्वच्छ करण्यासाठी तुम्ही फेसवॉश वापरू शकता. कारण यामुळे चेहऱ्यावरील सर्व प्रकारचे केमिकल्स निघून जातील.

## शॉर्ट न्यूज

### प्रियकराच्या मदतीने दोन मुलांचा खून

■ **हिवरगाव पावसा :** येथील रितेश व प्रणव सारंगधर पावसे या सख्ख्या भावांचा रामनवमीच्या दिवशी शेतमळ्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली होती; मात्र हा अकस्मात मृत्यू नसून, प्रेम संबंधात अडथळा नको म्हणून प्रियकराच्या मदतीने पोटच्या गोळ्यांचा खून केल्याचे उघड झाले. संगमनेर तालुका पोलिसांनी बुधवारी आई आणि प्रियकरावर खुनाचा गुन्हा दाखल केला. रितेश व प्रणव पावसे यांचा शेततळ्यातील पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. मात्र त्यांचा घातपात झाला असल्याचा आरोप नातेवाइकांनी केला होता.

### दत्तनगरला बसस्थानक उभारण्याची मागणी

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील दत्तनगर येथे नवीन बसस्थानक उभारण्यात यावे, अशी मागणी ग्रामपंचायत व बस आगार व्यवस्थापक यांच्याकडे तिसरी अदालत सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भाऊसाहेब खरात यांनी निवेदनाव्दारे केली आहे. या निवेदनात म्हटले आहे की, येथे बसस्थानक नसल्याने बस कुठे थांबते ते कळत नाही. त्यामुळे प्रवाशांना तसेच विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असून या ठिकाणी लवकरात लवकर बसस्थानक उभरण्यात यावे. अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

### पती पत्नीला लोखंडी पाईप, दांड्याने मारहाण

■ **राहुरी :** घराकडे येणारे टॉयलेटचे पाणी बंद केल्याने आरोपींनी दोघा पती पत्नीला शिवीगाळ धमदाटी करत लोखंडी पाईप, लाकडी दांडा व लाथा बुक्यांनी मारहाण केली. ही घटना राहुरी तालूक्यातील मालूंजे खुर्द येथे घडलीय. या मारहाणीत नवनाथ कणसे यांच्या आईच्या गळ्यांतील मंगळसुत्र तुटुन गहाळ झाले. आरोपी अविनाश आण्णासाहेब कणसे, आण्णासाहेब रंगनाथ कणसे, सुभद्रा आण्णासाहेब कणसे, अविनाश यांची पत्नी, सर्व रा. मालुंजे खुर्द, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास राहुरी पोलीसांकडून सुरु आहे.

### जमिनीच्या आरोग्याला प्राधान्य द्या

■ **नेवासा :** आधुनिक शेती तंत्रज्ञानामध्ये जमिनीच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य द्या, असे आवाहन कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी केले. नेवासा तालुक्यातील गोपाळपूर येथे महाराष्ट्र शासनाच्या कृषी संचालनालय अंतर्गत संजीवनी पंधरवडा साजरा करण्यात आला. त्यावेळी जमीन सुपिकतेबाबत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सचिन ढोकणे होते. डॉ. ढगे म्हणाले, आधुनिक शेती तंत्रज्ञानामध्ये जमिनीच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. कारण पीक उत्पादन वाढीमध्ये जमिनीची सुपीकता महत्त्वाची आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ **श्रीरामपूर :** शहरातील वॉर्ड नं. २ सनी चौक परिसरात मुलगी घरात एकटी आहे. अन्य कोणीही नाही हे हेरून तरुणाने तिच्या घरात घुसून अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला. घरी पाणी भरण्यासाठी दिलेली इलेक्ट्रिक मोटार घेण्यासाठी आरोपी अल्पवयीन मुलीच्या घरी गेला. घरात कोणी नाही. हे पाहून त्याने बळजबरीने मुलीवर अत्याचार केला. पीडित फिर्यादीवरून मुलीच्या पोलिसांनी आरोपी विनोद देठे या तरुणावर गुन्हा दाखल केला आहे.

# नीट परीक्षा गैरव्यवहार : संगमनेरमध्ये युवक काँग्रेसची निदर्शने

## दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी



**संगमनेर : प्रतिनिधी**

**मेडीकल शिक्षणाच्या प्रवेशासाठी अनिवार्य असलेल्या नीट-२०२४ या परीक्षेत मोठा गैरप्रकार झाला असून भाजप शासित राज्यातील विद्यार्थ्यांना ग्रेसमार्क देण्यात आले. यामुळे प्रामाणिक व पात्र विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय झाला असून या विरोधात युवक काँग्रेसच्या संगमनेर तालुकाध्यक्ष डॉ. जयश्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या वतीने निदर्शने करण्यात आली असून दोषींवर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन देण्यात आले.**

काँग्रेसचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन जनसंपर्क कार्यालयात संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी विविध परीक्षांमधील गोंधळ, नीट परीक्षेतील गैरप्रकार, नुकतीच रद्द झालेली यूजीसीची-नेट परीक्षा, याचबरोबर पोलिस भरतींसह इतर स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार बाबत तरुणांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यानंतर प्रांताधिकारी कार्यालय येथे नीट परीक्षा-२०२४ मध्ये झालेल्या घोटाळ्याची व गैरव्यवहाराची चौकशी होऊन पात्र विद्यार्थ्यांना न्याय मिळावा या मागणीची निवेदन डॉ. जयश्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

डॉ. थोरात म्हणाल्या, मेडिकलचे शिक्षण घेणे हे अनेक विद्यार्थ्यांचे स्वप्न असते आणि त्यामुळे इयत्ता दहावीनंतर अनेक विद्यार्थी रात्रंदिवस परिश्रम करतात. ही परीक्षा राष्ट्रीय पातळीवर होत असते. त्यामधील गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना एमबीबीएस सह इतर वैद्यकीय शिक्षणाला प्रवेश मिळतो. मात्र, यावर्षी भाजप शासित गुजरात, बिहार व हरियाणामधील १५६३ मुलांना अतिरिक्त ग्रेसमार्क देण्यात आले आहे.

यामध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला असून परीक्षांमधून मोठा घोटाळा निर्माण झाला. म्हणून या नीट परीक्षेतील गैरव्यवहार आणि घोटाळ्याची न्यायालयीन चौकशी व्हावी. तसेच पेपर फोडलेल्या सर्व दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी. गरीब व योग्य विद्यार्थ्यांना न्याय मिळावा. तसेच १८ जून रोजी झालेली नेट परीक्षा रद्द झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना मनस्ताप झाला आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी संगमनेर तालुका व शहर युवक काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते युवक व युवती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. अन्यथा काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन
विविध शासकीय परीक्षांमधील गैरव्यवहार आणि गैरप्रकार हा धोकादायक असून हे सर्व पारदर्शीपणे होणे गरजेचे आहे. अन्यथा होतकरू प्रामाणिक व गुणवंत विद्यार्थ्यांना न्याय मिळणार नाही. म्हणून शासनाने यावर वेळीच उपाय योजना करावी, अन्यथा युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही युवक काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष डॉ. जयश्री थोरात यांनी दिला.

# हमीभावातील वाढ अत्यंत तुटपुंजी

## केंद्र सरकारच्या निर्णयावर किसान सभेची नाराजी

**अकोले : प्रतिनिधी**

**केंद्रातील मोदी सरकारने विविध राज्यातील होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पाऊले उचलली आहेत. देशातील शेतकऱ्यांची नाराजी दूर करण्यासाठी हमीभाव वाढीला मंजुरी दिली. मात्र, ती अत्यंत तुटपुंजी आहे, अशी टीका किसान सभेने केली आहे.**



किसान सभेचे डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, उमेश देशमुख आणि डॉ. अजित नवले यांनी निवेदन काढून केंद्रातील मोदी सरकारवर टीका केली आहे.

शेतकरी विरोधी धोरणांमध्ये बदल करून खरीप हंगामात हमीभाव मूल्यात वाढ करून उत्पादन खर्चावर आधारित शेतकऱ्यांना परवणारे भाव जाहीर करेल, अशी अपेक्षा होती. मात्र, देशातील लाखो शेतकऱ्यांची ही अपेक्षा फलद्रूप झाली नाही, अशी टीका निवेदनातून करण्यात आली आहे.

# आम्हांला जनतेचा कौल मान्य

## सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन

**राहाता : प्रतिनिधी**



**अहमदनगर लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी निवडणूक आयोगाकडे ईव्हीएम मायको कंट्रोलर तपासणीची मागणी केली आहे. ही मागणी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आणि निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार केली असल्याची माहिती सुजय विखे पाटील यांनी शिर्डी येथे पत्रकार परिषदेत दिली. ही मागणी केवळ आमच्या कार्यकर्त्यांच्या आग्रही मागणीनुसार केली आहे, यातून कोणीही वेगळा अर्थ काढू नये, आम्हांला जनतेचा कौल मान्य आहे, अशी प्रतिक्रिया विखे पाटील यांनी यावेळी दिली.**

कोणत्याही उमेदवाराला निकाल लागल्यानंतर सात दिवसांच्या आत एकूण ईव्हीएम मशीनच्या ५ टक्के मशीनच्या मायक्रो कंट्रोलरची तपासणी करता येते. त्यामुळे ज्या केंद्रांवर कार्यकर्त्यांची शंका तीव्र होती, अशा ४० ठिकाणच्या ईव्हीएमच्या मायक्रो कंट्रोलर मशीनची तपासणीची मागणी रीतसर फी जीएसटी'सह भरून केली असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. निवडणुकीत जनतेने दिलेला कौल आपल्याला कालही मान्य होता आणि आजही मान्य आहे.

केवळ काही ठिकाणच्या कार्यकर्त्यांना त्या-त्या ठिकाणी आलेले निकाल मान्य नव्हते. त्यामुळे ज्या ठिकणी कार्यकर्त्यांच्या भावना अतिशय तीव्र होत्या, अशा ठिकाणच्या ईव्हीएम मशीनच्या मायक्रो कंट्रोलरच्या तपासणीची माहिती सर्वोच्च न्यायालयाच्या निकाल आणि निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार केली आहे. यातून कोणीही वेगळा अर्थ काढू नये, अशी विनंती सुजय विखे पाटील यांनी यावेळी केली.

(पान १ वरून)

# कान्हूरपठार वि.का. संस्थेच्या अध्यक्षपदी पांडूरंग गाडगे उपाध्यक्षपदी तुकाराम लोंढे यांची बिनविरोध निवड

स्वमालकीची इमारत व व्यापारी संकुल बांधण्याचे नियोजित असुन कान्हुर सोसायटी कोणत्याही संकटात शेतकऱ्यांच्या मागे खंबीर पणे उभी आहे भविष्य काळात निच्छित पणे शेतकरी हिताचे निर्णय घेऊन शेतकरी बांधवांना मदत करण्याचा संचालक मंडळ प्रयत्न करेल पुढील काळात संस्थेचे सभासद शेतकऱ्यांना जास्तीत जास्त कर्ज मिळवून देण्याचा प्रयत्न असणार आहे.

संस्थेचे आज २७७६ सभासद असुन भविष्यात हि संख्या संख्या वाढविण्यासह शेतकरी हितास प्राधान्य राहणार असल्याचे या आर्थिक वर्षात संस्थेने ८ कोटी २३ लाख रूपयांचे विक्रमी कर्ज वाटप केले होते शेतकरी अडचणीत असतांना देखील अशाही परिस्थितीत सभासदांनी चालु आर्थिक वर्षात बँक पातळीवर१०० टक्के कर्ज भरले असुन कान्हुरपठार सोसायटीचा हा विक्रमच म्हणावा लागेल या पुढील काळात सभासदांच्या मागणीनुसार संस्था शेतकऱ्यांच्या हितासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज वाटप व सभासदांना विमा संरक्षण देणार आहे असुन तर दुध धंद्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज देणार असल्याची माहिती गाडगे यांनी दिलीआहे.










# निरंकारी सेवकांचे स्वच्छता अभियान

## पोलीस ठाणे, भुमी अभिलेख परीसरासह स्वच्छतागृहही चकाचक

**पारनेर : प्रतिनिधी**

**संत निरंकारी सत्संग सोहळयाचे औचित्स साधून आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमांपैकी स्वच्छता अभयानांतर्गत निरंकारी सेवकांनी पारनेर शहरातील पोलीस ठाणे, भुमी अभिलेख तसेच तहसिल कार्यालयाचा परिसर स्वच्छ केले. भुमी अभिलेख परिसरातील स्वच्छतागृह देखील सेवकांनी चकाचक केले.**

पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियानास प्रारंभ करण्यात आला.यावेळी बोलताना ते म्हणाले, संत निरंकारी मंडळाचे सेवा कार्य प्रेरणादायी आहे. त्यांचा मानवता हाच धर्म हा संदेश माणसे जोडणारा आहे. मार्गदर्शक जयसिंग बोरूडे म्हणाले, सुदीक्षाजी महाराज यांच्या प्रेरणेतून संपूर्ण देशात सेवा सत्संग सोहळयाचे आयोजन करण्यात आले असून त्यास सेवकांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे ते म्हणाले. यावेळी



■ संत निरंकारी सत्संग सोहळयानिमित्त पारनेर येथे निरंकारी सेवकांच्या वतीने स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

भास्कर पिंपरकर, संतोष रेपाळे यांच्यासह अनेक साधक मोठया प्रमाणात उपस्थित होते.

साधकांनी पोलीस ठाणे, दुययम निबंधक, भुमी अभिलेख, तहलिस कार्यालय या गर्दीच्या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविले. त्यांच्या या उपक्रमाचे तालुकाभरातून आलेल्या नागरीकांनी कौतुक केले.

शुक्रवारी सकाळी पुणेवाडी, सोबलेवाडी, पारनेर ते चिंचोली अशी बाईक रॅली पार पडली.पुणेवाडीच्या सरपंच दिपाली रेपाळे, भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सिताराम बापू पुजारी यांच्या उपस्थितीत या रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. शनिवारी चिंचोली येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून रविवारी अशाक राउत यांच्या उपस्थितीमध्ये संत निरंकारी सत्संग सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. पुणेवाडीच्या श्री भैरवनाथ मंदिराच्या प्रांगणात सत्संग सोहळा पार पडणार आहे.

# हंगे विद्यालयात जागतिक योग दिन उत्साहात

## शिक्षकांनी विषद केले योगाचे महत्व

**हंगे : प्रतिनिधी**

**तालुक्यातील हंगे येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कुलमध्ये जागतिक योग दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षकांनी योगाचे महत्व विषद करत विद्यार्थ्यांनी नियमित योगा करण्याचे आवाहन करण्यात आले.**

न्यू इंग्लिश स्कुलमध्ये क्रीडा शिक्षक राजेंद्र टापरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक डॉ. सुदर्शन धस यांनी जागतीक योग दिनाचे औचित्य साधून योगासने व प्राणयाम यांचे महत्व विषद केले. योगासने कशी करावीत याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी दररोज नियमितपणे व्यायाम करण्यावर भर देत योगासने तसेच प्राणायाम करून आपले शरीर निरोगी व सुदृढ ठेवण्याचे आवाहन मुख्याध्यापक डॉ. सुदर्शन धस यांनी केले.

यावेळी विद्यालयाचे क्रिडा शिक्षक राजेंद्र टापरे, रमेश दरेकर, अनिल खांदवे,



■ रयत शिक्षण संस्थेच्या हंगे येथील न्यू इंग्लिश स्कुलमध्ये जागतीक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

संदीप शिंदे, रोहिदास भालेराव व डॉ. सुदर्शन धस यांनी सर्व विद्यार्थ्यांना बैठे योगासन व उभे योगासन कसे करावे याबाबत प्रात्यक्षिक दाखवत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष योगासने करून घेण्यात आली.
हंगे गावचे आरोग्य अधिकारी डॉ. नितीन कोल्हे, जीवन म्हात्रे, श्रीमती बेलोटे यांनी निरोगी आरोग्य ठेवण्यासंदर्भात उपस्थितांना माहीती दिली. पसायदानाने या उपक्रमाची सांगता करण्यात आली.

या उपक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाच्या सांस्कृतीक विभाग प्रमुख श्रीमती शोभा भालेराव, श्रीमती भारती म्हस्के, जयश्री श्रीरसागर, सुवर्णा भोर, राजश्री धात्रक, कल्पना चौधरी, ज्योती बांडे, जयसिंग खोडदे, रावसाहेब पायमोडे, संतोष पवार यांनी परीश्रम घेतले.

# योग सर्वांगसुदृढता संपन्नतेसाठी आवश्यक

## प्रा. राजाराम गोर्डे यांचे प्रतिपादन



**अळकुटी : प्रतिनिधी**

**मन सुदृढ असेल तर शरीर सुदृढ राहते. मनःशांती व शारीरिक सुदृढतेसाठी योगा मानवी जीवनासाठी महत्वाचा आहे. जागतिक पातळीवर भारतीय योगविद्येस अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झालेले आहे. आजच्या धावत्या जीवनशैलीत योग व ध्यानधारणा गरजेची आहे. एकूणच योग सर्वांगसुदृढता संपन्नतेसाठी आवश्यक आहे असे प्रतिपादन शारीरिक शिक्षण तथा क्रीडा विभागप्रमुख प्रा. राजाराम गोर्डे यांनी केले.**

लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील पद्मभूषण उपाधीने सन्मानित, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे दहावा अंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. अद्यत्वे सम्पूर्णे विश्वे योगः लोकप्रियः अस्ति, तस्य महत्त्वं सर्वे अवगन्तुं शक्नुवन्ति। जीवने योगस्य महत्त्वं अधिकं महत्त्वपूर्णम् अस्ति। योगस्य साहाय्येन वयं बहिः आन्तरिकं च स्वशरीरं स्वस्थं स्थापयितुं शक्नुमः। या संस्कृत श्लोकाद्वारे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी योगदिनाचे महत्व विषद केले.

यावेळी उपप्राचार्य अर्जुन चाटे यांनी योगदिनाचा इतिहास सांगितला याप्रसंगी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विशाल रोकडे यांनी केले.

# महाराष्ट्रीयन महिलांनी जपली चेन्नईतही परंपरा!

## मोठ्या उत्साहात केली वटपौर्णिमा साजरी

**भाळवणी : अभिजित कपाळे**

**आपल्या महाराष्ट्रीयन पुरुष-महिला नोकरी व्यवसायानिमित्त देशात, परदेशात स्थिरस्थावर झालेले असताना आपले पारंपारिक सण, उत्सव, संस्कृती मोठ्या प्रमाणात जपताना आपण पाहतो. असाच एक महिलांचा सण म्हणजे वटपौर्णिमा.**

या वटपौर्णिमेच्या निमित्ताने महाराष्ट्रीयन महिलांनी चेन्नई येथे पारंपारिक पद्धतीने हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला. गोरेगाव (ता. पारनेर, जि. अहमदनगर) येथील सौ. सुजाता संदीप पानमंद (कपाळे) हिने महाराष्ट्रीयन महिलांबरोबर वटपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली. यावेळी सायली, सुजाता, मृणाल, अनु तसेच




■ चेन्नई येथे महाराष्ट्रीयन संस्कृती जपत वटपौर्णिमा साजरी करताना सायली, सुजाता, मृणाल व अनु या महाराष्ट्रीयन महिला.(छाया: संदीप पानमंद (चेन्नई, तामिळनाडू )

इतरही महिलांनी वटवृक्षाची पुजा करून आपली भारतीय संस्कृती जपली आहे.

# योगाचे महत्त्व दिर्घकालीन - योगा प्रशिक्षक सोमनाथ ढवळे

**निघोज : प्रतिपादन**

**योगा हा शारिरीक शिक्षण माध्यमिक सर्वोत्तम उपाय असून विद्यार्थ्यांनी शारिरीक शिक्षणाचा अभ्यास करीत योगाला सर्वोत्तम महत्व देण्याचे प्रतिपादन योग प्रशिक्षक सोमनाथ ढवळे यांनी व्यक्त केले आहे.**




मुलिका देवी विद्यालयाच्या वतीने योगा दिनाचे महत्त्व व प्रशिक्षण या विषयावर शुक्रवार दि.२१ जून रोजी योग दिनाच्या निमित्ताने व्याख्यान घेण्यात आले यावेळी ढवळे बोलत होते. यावेळी ढवळे यांनी एक तास अडीच हजार विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण दिले तसेच व्याख्यान माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रबोधन केले. विद्यालयाचे प्राचार्य अर्जुन भुजबळ या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

ढवळे यावेळी म्हणाले योग दिनाच्या माध्यमातून मुलिकादेवी माध्यमिक विद्यालयाने गेली अनेक वर्षे योगाचे महत्त्व काय आहे याबाबत वेळोवेळी प्रबोधन केले आहे. आजचा युवकांचा काळ हा कसोटीचा कार्यकाळ आहे. सोशल मिडिया मध्ये अग्रेसर राहताना दिवसभरात योगासाठी एक तास देण्याची गरज आहे. योगाचे महत्त्व जगात असून रामदेव बाबा यांनी जगात योगाची ख्याती करुन देशाचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

विद्यालयाचे प्राचार्य भुजबळ सर व त्यांच्या सहकाऱ्यांचे काम चांगले असून अशाप्रकारे काम करून शैक्षणिक क्षेत्राचा नावलौकिक होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. यावेळी प्राचार्य अर्जुन भुजबळ यांनी प्रास्ताविक करताना योग प्रशिक्षक सोमनाथ ढवळे हे एस एस वाय माध्यमातून निघोज आणी परिसरात चांगले काम करीत असून योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी लक्षात घेऊन युवक व ज्येष्ठ मंडळींनी योगा नियमित करण्याचे आवाहन केले आहे. यावेळी विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपसरपंच सुरज मचाले यांचा सत्कार

## शेततळ्यात बुडणाऱ्या मुलांना दिले जीवदान



**निघोज : प्रतिनिधी**

**शिरुर तालुक्यातील इनामगावचे उपसरपंच सुरज मचाले यांनी चार दिवसांपूर्वी एका शेततळ्यात बुडणाऱ्या पाच मुलांना जीवदान देण्याचे महान काम केले.**

अशा या देवदूताचा सत्कार शिरुर येथील आधारछाया फाऊंडेशन तर्फे करण्यात आला.त्यावेळी घडलेल्या प्रसंगाचा थरारक अनुभव ऐकून अंगावर रोमांच उभे राहिले.त्यांच्या धाडसाचे कौतुक सर्वांनीच केले.कार्यक्रमाला सविता बोरुडे,डॉ. वैशाली साखरे ,प्रिती बनसोडे ,ज्योति हांडे,सारिका विरशैव ,सुजाता रासकर ,मंगल गायकवाड,वैशाली ठुबे शितल शर्मा,स्वप्नाली जामदार,तृप्ती जोशी, ॲड. आंबेकर, बागवान चारापाणी इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिरुर येथील सामाजिक कार्यकर्त्या सविता बोरुडे यावेळी म्हणाल्या इनाममगावचे उपसरपंच सूरज मचाले यांचे सामाजिक योगदान मोठ्या प्रमाणात असून शेततळ्यात बुडणाऱ्या पाच मुलांना जिवदान देऊन त्यांनी एकप्रकारे ईश्वरी सेवा केली असून ईश्वर सेवा व सामाजिक कार्य यांचा समन्वय जीवणात फार महत्वपूर्ण असून अशाप्रकारे आजच्या युवकांनी प्रेरणादायी काम करण्याचे आवाहन बोरुडे यांनी केले आहे . मचाले यांचे पुणे व नगर जिल्ह्यात कौतुक होत आहे.

# जिल्हा परिषद मराठी शाळेत योग प्रशिक्षण

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक कैलास शिंदे, सुभाष महाराज मगर, काळे सर,काळोखे सर, सालके मॅडम, दिघे मॅडम तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुभाष महाराज मगर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण देऊन माहिती दिली.**

योगा हा शरीर तंदुरुस्त राहण्यासाठी सर्वोत्तम पर्याय असून



विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच योग प्रशिक्षक घेण्यासाठी दिवसभरातील अमुल्य वेळ देऊन सुर्य नमस्कार करीत योगाला महत्व द्यावे तसेच घरातील ज्येष्ठ मंडळी आई वडील यांना योगाचे महत्त्व सांगत निरोगी आयुष्याचा मंत्र म्हणजे योगा हे लोकप्रबोधन करण्याचे आवाहन केले.

यावेळी मुख्याध्यापक कैलास शिंदे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच काळे सर यांनी आभार मानले.

# रुग्णसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणार

## ■ डॉ. श्रीकांत पठारे यांचा शब्द ■ कातळवेढा या ठिकाणी नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर



**कातळवेढा : प्रतिनिधी**

**शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे पारनेर तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्याच्या ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात सध्या नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर राबवले जात आहे. पारनेर तालुक्यातील कातळवेढा या ठिकाणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

यावेळी डॉ. श्रीकांत पठारे म्हणाले ग्रामीण भागामध्ये रुग्णसेवा पोहोचविणे हे प्रामुख्याने उद्देश आहे. सर्वसामान्य गोरगरीब जनतेची सेवा करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. आपल्या पारनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेपर्यंत रुग्णसेवा पोचली पाहिजे यासाठी यापुढील काळात काम करत राहणार आहे. नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला दृष्टी देण्याचा प्रयत्न करत राहणार असल्याचे डॉ. श्रीकांत पठारे मनाली तसेच ते पुढे बोलताना म्हणाले शिवसेना हा पक्ष ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करतो या तत्त्वाला धरून या पुढील काळात तालुक्यात काम करत राहणार आहे. तसेच यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख डॉ. पठारे यांनी शिवसेना पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे पारनेर तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांच्या समवेत कातळवेढा गावचे सरपंच पियुष गाजरे, अजित भाईक, मोहित जाधव, अक्षय फापाळे, प्रशांत निंबाळकर, महेश गुंजाळ, सचिन पवार, विलास भाईक, यशवंत पवार, भाऊ गुंड, दत्तात्रय गाजरे, बाबाजी भाईक, उत्तम भाईक, प्रमोद गाजरे, गेनूभाऊ भाईक, सोपान गाजरे, नारायण वाघ, दिनेश वाघ, दत्ता भाईक, रघुनाथ गुंड, रघुनाथ भाईक, ज्ञानदेव गुंड, रखमा गुंड, बबन गुंड, बाळू दरेकर, सुभाष गुंड, सुमन गाजरे रेउबाई भाईक, चंद्रभागा भाईक, भाऊसाहेब पवार, युवराज गाजरे, आदी ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते. कातळवेढा या ठिकाणी नेत्र तपासणी शिबिरामध्ये १०० पेक्षा जास्त रुग्णांनी लाभ घेतला.

डॉ. श्रीकांत पठारे यांनी सावरगाव, नांदूर पठार, काकणेवाडी, कासारे, डोंगरवाडी या ठिकाणी नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे घेतली आहेत. या शिबिराचा अनेक लोकांना फायदा होत आहे. यावेळी डॉ. श्रीकांत पठारे यांचा कातळवेढा ग्रामपंचायतच्या वतीने सत्कार व सन्मान करण्यात आला. डॉ. पठारे हे सर्वसामान्यांची सेवा करणारे नेतृत्व म्हणून तालुक्यात पुढे येत आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com